# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०-४-२०१९ रोजी (का.प.क्र.३०) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक २० एप्रिल २०१९ रोजी (का.प.क्र.३०) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा.वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.डी.पी.कुलकर्णी, नगरसचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| २. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| ३. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| ४. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| ५. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| ६. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ७. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ८. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागरअप्पा |
| ९. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| १०. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ११. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| १२. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| १३. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| १४. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माजी महापौर श्री.शांताराम काळे यांचे दु:खद निधन झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री कैलास गायकवाड :यास अनुमोदन आहे. तसेच श्री.किशनचंद तणवानी यांचे मातोश्रीचे निधन झाले त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी उभे रहावे. तसेच श्री.किशनचंद तणवानी यांचे मातोश्रीचे निधन झालेले आहे त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(या वेळी स्व.शांताराम काळे तसेच श्री.तणवानी यांच्या मातोश्री यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर :आजच्या सभेला गणपुर्ती नाही. तसेच लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू आहे. काल काही वर्तमानपत्रात पाणीपट्टी बद्दल दर वाढ करून पाणीपट्टी वसुली करण्याबाबत झोन कार्यालयामार्फत मागणी पत्रक देण्यात आले. या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा झाली. यांनीही नाराजी

व्यक्त केली. तसा खुलासा वृत्तपत्रात आला आहे. श्री.कोल्हे यांचे याकडे लक्ष असायला पाहिजे. जर अधिकारी सभेच्या निर्णयाच्या विरोधात परस्पर निर्णय घेत असेल तर योग्य नाही. असे दर पत्रक देणे चुकीचे आहे. हे कोणी मुद्दामहून केलेले आहे का? आता उन्हाळा सुरू आहे. पाणी टंचाई आहे, निवडणुका आहे. अशा परिस्थितीत हे करणे योग्य नाही. आताच मा.आयुक्तांनी सांगितले की, त्याबाबत शुध्दीपत्रक काढले जाईल. तशी कार्यवाही करावी. जनतेपर्यंत माहिती जावी की, पाणीपट्टी दरवाढ करणार नाही. आचार संहितेचे आपण पालन करतो आहे परंतु जनतेच्या भावनेशी विषय असेल तर हस्तक्षेप करावा लागतो. त्यानुसार आदेश करण्यात येतो की, जे काही पेपरला आले ते थांबवावे. जो निर्णय घ्यायचा तो घेण्यात येईल.

श्री.कैलास गायकवाड :जी चूक झाली त्याचा खुलासा पेपरच्या माध्यमातून द्यावा. उद्याच्या पेपरला पब्लीकेशन यावे.

श्री.गजानन बारवाल :अनेक लोकांना कुत्र्याने चावा घेतला. परंतु दवाखान्यात रेबीज लस उपलब्ध नाही. अत्यावश्यक बाब म्हणून लक्ष द्यावे. बन्सीलालनगर आरोग्य केंद्रात त्याची लस उपलब्ध नाही. इतरही आरोग्य केंद्रात लस नाही. २५-३० लोकांना त्याची दररोज आवश्यकता असते.

मा.महापौर :आरोग्य अधिकारी यांना बोलवून घ्यावे. ताबडतोब कार्यवाही करावी. मनपा आरोग्य केंद्रात ती लस ठेवावी. तसेच निवडणूकीच्या काळात लाईट बंद असू नये. मतदान केंद्रावर लाईटची व्यवस्था करावी. शहरातील आवश्यक कामे करावी. कामाच्या बाबतीत तक्रारी येऊ नये याची दखल घ्यावी. जे अधिकारी गैरहजर आहे त्याचा खुलासा घ्यावा, प्रत माझेकडे द्यावी. लोकसभा आचारसंहिता चालू आहे त्यामूळे आजची सभा संपविण्यात येते.

या बरोबरच सभा राष्ट्रगिताने संपविण्यात येते.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरित/-** | **स्वाक्षरित/-** |
| नगर सचिव | महापौर |
| महानगरपालिका औरंगाबाद | महानगरपालिका औरंगाबाद |